श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी,
संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी.

## सूचना

वार: शुक्रवार — दिनांक: २१/११/२०२५

महाविद्यालयातील बी.एड., बी.पी.एड., एम.एड. व एम.पी.एड. विभागातील सर्व प्रशिक्षणार्थी, विभाग प्रमुख, प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, **कर्मवीर डॉक्टर मामासाहेब जगदाळे** यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाच्या कर्मवीर जलतरण तलावा मध्ये **दि. २२ नोव्हेंबर २०२५** रोजी आपल्या संस्थेच्या शाखांतर्गत **'कर्मवीर जलतरण स्पर्धांचे'** आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेचा उदघाटन कार्यक्रम सकाळी ठीक १०:०० वा. आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमास सर्वांनी वेळेत उपस्थित राहावे.

कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी, जि.सोलापूर

Shuhan
प्रभारी प्राचार्य
कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी
जि.सोलापूर ४१३४११

**SHRI SHIVAJI SHIKSHAN PRASARAK MANDAL, BARSHI**

**College of Education, Barshi**

**Notice**

**Day:** Friday — **Date:** 21/11/2025

All student-teachers, Heads of Departments, faculty members, and non-teaching staff of the B.Ed., B.P.Ed., M.Ed., and M.P.Ed. programmes are hereby informed that, on the occasion of the **123rd Birth Anniversary of Karmaveer Dr. Mamasaheb Jagdale**, **Karmaveer Swimming Competitions** have been organized on **22 November 2025** at the **Karmaveer Swimming Pool** of the College for the branches of our institution.

The inaugural ceremony of the competition has been scheduled at **10:00 a.m.** All concerned are requested to remain present at the venue on time and grace the occasion with their participation.

College of Education, Barshi, Dist. Solapur 413 411

Shuhan
**I/C Principal**
College of Education, Barshi
Dist. Solapur 413 411

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमित्त

आयोजित

## कर्मवीर जलतरण स्पर्धा

## अहवाल

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी च्या कर्मवीर जलतरण तलावा मध्ये दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी कर्मवीर डॉक्टर मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त कर्मवीर जलतरण स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यात आल्या. यामध्ये माध्यमिक स्तरावर दोन गट करण्यात आले होते तसेच उच्च माध्यमिक गट व महाविद्यालयीन गट यामध्ये मुलं व मुले अशागटांमध्ये स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेसाठी फ्रीस्टाइल, बॅकस्ट्रोक, ब्रेस्ट स्ट्रोक व बटरफ्लाय असे जलतरणाचे प्रकार घेण्यात आले. यासाठी 50 मीटर 100 मीटर 200 मीटर व 800 मीटर या अंतराच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेच्या उद्धाटन प्रसंगी संस्थेचे जनरल सेक्रेटरी मा. श्री पी. टी. पाटील साहेब, कॉलेज ऑफ एज्युकेशनचे विद्यमान प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे हे अध्यक्षस्थानी होते तसेच बी.पी.एड. विभाग प्रमुख प्रा. डॉ . ए. जी. कांबळे, एम. पी. एड. विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. एम. लांडगे, कर्मवीर जलतरण तलावाचे व्यवस्थापक श्री सुर्यप्रताप देशमुख व जलतरण मार्गदर्शक श्री. बाळराजे पिंगळे उपस्थित होते. उद्धाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे मा.पी.टी. पाटील साहेब यांनी बार्शी शहर व तालुक्यातील विद्यार्थ्यांना कर्मवीर जलतरण तलावाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी अभ्यासाबरोबर शारीरिक मेहनत करण्यासाठी ही प्रोत्साहित केले त्यासाठी जलतरण हा अतिशय उत्तम क्रीडा प्रकार असल्याचे प्रतिपादन केले. तसेच जलतरण हा सर्वांगिण शारीरिक व्यायाम आहे. सर्व व्यायामांमध्ये पोहणे हा उच्च दर्जाचा व सर्वार्थाने सुंदर व्यायाम असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले . पोहण्यामुळे शरीराचा सर्वांगीण विकास होतो, तसेच मानसिक तणावरहित आरोग्याची जपणूक होते, हे त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. तसेच कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासाला नेहमीच समान महत्त्व दिले होते, याचीही त्यांनी उपस्थितांना विशेष आठवण करून दिली. आपल्या अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रमुख पाहुणे तसेच उपस्थित मान्यवरांचे कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या वतीने हार्दिक स्वागत केले. स्पर्धक विद्यार्थी-विद्यार्थिनींना शुभेच्छा देताना त्यांनी सांगितले की, स्पर्धेत सहभागी होताना निकोप वातावरण जपावे आणि स्पर्धेचा आत्मीयतेने आनंद घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

एकूण ४८ प्रशिक्षित स्पर्धकांनी या स्पर्धेमध्ये यशस्वीपणे सहभाग नोंदवला. पारितोषिक वितरण कॉलेज ऑफ एज्युकेशन चे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. व्ही.पी शिखरे यांच्या हस्ते करण्यात आले या स्पर्धेसाठी स्पर्धा प्रमुख म्हणून प्रा. डॉ. ए.जी. कांबळे यांनी काम पाहिले तसेच या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे

एम.पी.एड. विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुरेश लांडगे, बी. पी. एड. विभाग प्रमुख प्रा. डॉ अनिल कांबळे, प्रशिक्षक श्री. बाळराजे पिंगळे आणि श्री सुर्यप्रताप देशमुख यांचे विशेष सहकार्य लाभले. उदघाटन व पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे  कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहा. प्रा. डॉ. पंकज नरळे यांनी प्रभावीपणे केले. याशिवाय महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उत्साहाने आणि मनापासून सहकार्य केले. तसेच बी.पी.एड. व एम.पी.एड. चे विद्यार्थी यांनी स्पर्धेचे  उत्कृष्ट पंचकार्य केले व उत्साहाने आणि मनापासून सहकार्य केले. या जलतरण स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्तीबद्दल जागरूकता वाढण्यासोबतच खेळांविषयी उत्साह आणि स्पर्धात्मकता नक्कीच वृद्धिंगत झाली. महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेत ही स्पर्धा यशस्वी ठरली.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

Organized

# Karmaveer Swimming Competition

## Report

The *Karmaveer Swimming Competition* was successfully organized on **22 November 2025** at the **Karmaveer Swimming Pool** of the College of Education, Barshi, managed by *Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Barshi*, on the occasion of the **123rd Birth Anniversary of Karmaveer Dr. Mamasheb Jagdale**.

The competition included two groups at the secondary level, as well as separate categories for boys and girls in the higher secondary and college levels. Events were conducted in the **Freestyle, Backstroke, Breaststroke, and Butterfly** swimming styles. Distances included **50 meters, 100 meters, 200 meters, and 800 meters**.

**Inauguration Ceremony**

The event was inaugurated in the presence of:

- **Mr. P. T. Patil**, General Secretary, Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal
- **Dr. V. P. Shikhare**, In-charge Principal, College of Education, Barshi (President of the function)
- **Dr. A. G. Kamble**, Head, B.P.Ed. Department
- **Dr. S. M. Landge**, Head, M.P.Ed. Department
- **Mr. Suryapratap Deshmukh**, Manager, Karmaveer Swimming Pool
- **Mr. Balraje Pingle**, Swimming Coach

During the inauguration, the chief guest **Hon. Mr. P. T. Patil** appealed to the students of Barshi city and taluka to make active use of the Karmaveer Swimming Pool. He emphasized that along with academics, students must also engage in physical activities, and described swimming as one of the best forms of exercise. He highlighted that swimming ensures holistic physical development, helps maintain mental well-being, and is considered one of the most effective and graceful full-body workouts.

He further reminded the gathering that **Karmaveer Dr. Mamasheb Jagdale** always gave equal importance to physical and intellectual development of students.

In his presidential address, **Prof. Dr. V. P. Shikhare** warmly welcomed all dignitaries and extended best wishes to all participants. He encouraged students to maintain a healthy competitive spirit and enjoy the event with enthusiasm and sportsmanship.

**Competition Details**

A total of **48 trained swimmers** enthusiastically participated in the competition. The **prize distribution ceremony** was conducted at the hands of **Prof**. **Dr. V. P. Shikhare**, In-charge Principal.

**Competition Director:**

- **Dr. A. G. Kamble**

**Special Support:**

- **Prof. Dr. Suresh Landge**, Head, M.P.Ed.
- **Prof. Dr. Anil Kamble**, Head, B.P.Ed.
- **Mr. Balraje Pingle**, Coach
- **Mr. Suryapratap Deshmukh**

The inauguration and prize distribution programs were coordinated and compered effectively by **Assistant Professor Dr. Pankaj Narale**, who also delivered the vote of thanks.

All teaching and non-teaching staff of the college contributed wholeheartedly to the success of the event. Students of **B.P.Ed. and M.P.Ed.** also performed excellent officiating duties and assisted enthusiastically throughout the competition.

**Conclusion**

The Karmaveer Swimming Competition not only enhanced students' awareness of physical fitness but also fostered enthusiasm for sports and healthy competitiveness. The event proved to be a significant and successful addition to the rich sports tradition of the College of Education, Barshi.

You Tube Link: https://youtu.be/_p5dHvYw9zo

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमित्त
आयोजित

## कर्मवीर जलतरण स्पर्धा

## स्पर्धेचे फोटो

---




उदघाटन प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन




प्रमुख पाहुणे मा. श्री. पी. टी. पाटील यांचे प्राचार्यांच्या हस्ते स्वागत

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमित्त

आयोजित

## कर्मवीर जलतरण स्पर्धा

## स्पर्धेचे फोटो

---




उदघाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना  प्रमुख पाहुणे मा. श्री. पी. टी. पाटील




उदघाटन प्रसंगी अध्यक्षीय समारोपात मार्गदर्शन करताना प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. वि. पी. शिखरे

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमित्त

आयोजित

## कर्मवीर जलतरण स्पर्धा

## स्पर्धेचे फोटो

---




प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण



# कार्यक्रम पत्रिका

D:\SSGKaryakram Patrika222



श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित

**कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी**

**कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमीत्त आयोजित**

## कर्मवीर जलतरण स्पर्धा-२०२५



**उद्घाटन समारंभ**

**कार्यक्रम पत्रिका**

**वारः शनिवार -२२.११.२०२५** **वेळः सकाळी १०.०० वा.**

**स्थळः कर्मवीर जलतरण तलाव**

---

**प्रमुख पाहुणे : मा.पी.टी.पाटील (जनरल सेक्रेटरी, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी)**

**अध्यक्ष : मा.प्रा.डॉ.व्ही.पी.शिखरे (प्रभारी प्राचार्य कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी)**

---

| | | | |
|---|---|---|---|
| * | प्रतिमा पूजन | : | **उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते** |
| * | प्रास्ताविक व पाहूण्यांची ओळख | : | **प्रा.डॉ.ए.जी.कांबळे (बी.पी.एड विभाग प्रमुख)** |
| * | मान्यवरांचे स्वागत | : | **मा.पी.टी.पाटील साहेब यांचे अध्यक्ष प्र.प्राचार्य<br>प्रा.डॉ.व्ही.पी.शिखरे यांचे हस्ते** |
| * | प्रमुख पाहुणे मार्गदर्शन | : | **मा.पी.टी.पाटील<br>(जनरल सेक्रेटरी, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी)** |
| * | अध्यक्षीय समारोप | : | **मा.प्रा.डॉ.व्ही.पी.शिखरे<br>(प्रभारी प्राचार्य कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी)** |
| * | आभार | : | **डॉ.पी.पी.नरळे** |
| * | सूत्रसंचालन | : | **डॉ.पी.पी.नरळे** |

---------********----------

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमित्त
आयोजित

## कर्मवीर जलतरण स्पर्धा

## बातमी

पुढारी

# बार्शीत कर्मवीर जयंतीनिमित्त जलतरण स्पर्धा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त कॉलेज ऑफ एज्युकेशनच्यावतीने जलतरण स्पर्धा झाल्या.

स्पर्धेचे उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे पी. टी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. विष्णू शिखरे होते. याप्रसंगी पाटील म्हणाले की, जलतरण हा सर्वांगिण शारीरिक व्यायाम आहे. सर्व व्यायामांमध्ये पोहणे हा उच्च दर्जाचा व सर्वार्थाने सुंदर व्यायाम असल्याचे त्यांनी पटवून दिले.



**बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या वतीने आयोजित जलतरण स्पर्धेतील विजेते. समवेत उपस्थित मान्यवर.**

पोहण्यामुळे शरीराचा सर्वांगिण विकास होतो, तसेच मानसिक तणावरहित आरोग्याची जपणूक होते, हे त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासाला नेहमीच समान महत्त्व दिले होते, याचीही त्यांनी उपस्थितांना विशेष आठवण करून दिली. त्यांच्या मार्गदर्शनातून सर्व विद्यार्थी-शिक्षकांना खेळांविषयी प्रेरणा मिळाली.

जलतरण स्पर्धेत माध्यमिक, उच्च माध्यमिक गट व महाविद्यालयीन गट यामध्ये मुले व मुली अशाप्रकारे स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेसाठी फ्रीस्टाईल, बॅकस्ट्रोक, ब्रेस्ट स्ट्रोक व बटरफ्लाय असे जलतरणाचे प्रकार घेण्यात आले. यासाठी ५० मीटर, १०० मीटर, २०० मीटर व ८०० मीटर या अंतराच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. अनिल कांबळे यांनी करून दिला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. पंकज नरळे यांनी केले.

My Solapur Edition
Nov 29, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमित्त
आयोजित

## कर्मवीर जलतरण स्पर्धा

## सहभागी शाखांची यादी

| अ.क्र. | शाखेचे नाव |
|---|---|
| १ | जय हिंद विद्यालय कसबे तडवळे |
| २ | महाराष्ट्र विद्यालय, बार्शी |
| ३ | वखारिया विद्यालय, उपळे दुमाला |
| ४ | संत ज्ञानेश्वर विद्यालय भातंबरे |
| ५ | कॉलेज ऑफ नर्सिंग, बार्शी |
| ६ | श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी |
| ७ | बी. पी. सुलाखे (जुनियर) |
| ८ | डॉ. मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालय, बार्शी |
| ९ | शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय, बार्शी |
| १० | राजर्षि शाहू विधी महाविद्यालय, बार्शी |
| ११ | बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी |
| १२ | कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी (आयोजक महाविद्यालय) |